| | |
|---|---|
| दाखल तारीख | २० ०१ २०२० |
| नोंदणी तारीख | २० ०१ २०२० |
| निकाल तारीख | ०१ ०८ २०२६ |
| कालावधी | म दि |
| | ०६ ०६ १२ |

**न्यायदंडाधिकारी वर्ग –१ देवगड, तालुका देवगड, जिल्हा सिंधुदूर्ग**
(पिठासीन अधिकारी श्रीकांत एस. पचंडी )

**इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.२/२०२०**
**निशाणी क्र. ७०**

**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–००००२७–२०२०**

हर्षाली आनंद जाधव
लग्नाअगोदरची
देवता महादेव हिंदळेकर
वय ४० वर्षे, धंदा – गृहिणी
रा. मु.पो. आशिये रोड, सोनगे वाडी,
सरस्वती अपार्टमेंट,
ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग
सध्या रा. हिंदळे, देवगड, जि. सिंधुदुर्ग ... **अर्जदार**

**विरुध्द**

१] आनंद श्रीधर जाधव
वय ५५ वर्षे, धंदाः नोकरी

२] तृप्ती आनंद जाधव
वय १८ वर्षे, धंदाः शिक्षण

३] नेहा आनंद जाधव
वय २१ वर्षे, धंदाः शिक्षण

सामनेवाला क्र.१ ते ३ रा. – आशिये रोड,
सोनगे वाडी, सरस्वती अपार्टमेंट,
ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग .... **सामनेवाले**

-----------------------------------

अर्जदार तर्फे विधिज्ञ — श्रीमती एस.एस.कालेकर
सामनेवाला क्र.१ तर्फे विधिज्ञ — श्री.आर.एस.गव्हाणकर
सामनेवाला क्र.२ व ३ – एकतर्फा

-----------------------------------

**न्यायनिर्णय**

(दिनांक ०१ ऑगस्ट २०२६ रोजी जाहीर केला)

प्रस्तुत अर्ज हा अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ मधील कलम १२ अन्वये दाखल केला आहे. अर्जदार हिने आपल्या अर्जामध्ये प्रस्तुत कायद्यातील विविध तरतुदी अंतर्गत संरक्षणात्मक आदेश, निवासी आदेश, आर्थिक सहाय्य, नुकसान भरपाई इत्यादी ची मागणी केली आहे.

**अर्जदार यांनी विषद केलेली हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे –**

०२. अर्जदार हिच्या कथना नुसार अर्जदार व सामनेवाला क्र.१ हे नात्याने पती पत्नी असून त्यांचा विवाह दि.१८/११/२०१२ रोजी बौध्द

धर्म रिती रिवाजा प्रमाणे पार पडला आहे. सामनेवाला क्र.२ व ३ या सामनेवाला क्र.१ याच्या पहिल्या पत्नी पासून झालेल्या मुली आहेत.

०३. लग्ना नंतर अर्जदार ही सामनेवाला याच्या घरी नांदावयास गेली. त्यानंतर सामनेवाला क्र.१ यांनी अर्जदार हिच्या सोबत एक ते दोन महिने कसाबसा सुखाने संसार केला. परंतु त्यानंतर सामनेवाला क्र.१ ते ३ हे अर्जदार हिला घाणेरडया शिव्या देऊ लागले. तसेच अर्जदार हिला दोन–दोन दिवस जेवण्यास न देणे, सतत अपमान व मारझोड करणे असे प्रकार करु लागले. परंतु संसार टिकवण्याच्या हेतुने व सामनेवाला क्र.१ ते ३ यांच्या स्वभावात बदल होईल या आशेने अर्जदार ही सामनेवाला यांचा छळ सहन करत राहिली. सामनेवाला यांच्या छळामुळे अर्जदार हिला ब्लड प्रेशर व थायरॉईड सारखे आजार जडले.

०४. दि.०४/११/२०१९ रोजी सामनेवाला क्र.१ व २ यांनी अर्जदार हिला घाणेरडया व अश्लील शिव्या देऊन तिला हाताला धरुन घरातून बाहेर काढले. तेव्हा पासून अर्जदार ही आपल्या माहेरी मौजे हिंदळे येथे राहत आहे. अर्जदार हिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तसेच तिच्या माहेरची परिस्थीती देखील हालाखिची व गरिबीची आहे. याउलट सामनेवाला क्र.१ याला दरमहा ५५,०००/– ते ६०,०००/– रुपये पगार मिळतो. सामनेवाला क्र.३ ही मुंबई येथे नर्स म्हणून कार्यरत असून तिला देखील दरमहा ३०,०००/– रुपये पगार आहे.

०५. अर्जदार हिच्या कथना नुसार तिच्या उदरनिर्वाह तसेच औषधोपचारा करिता तिला सामनेवाला क्र.१ याच्या कडून दरमहा किमान रक्कम रुपये दहा हजार पोटगी तसेच झालेल्या शारिरीक, मानसिक व आर्थिक त्रासाच्या नुकसानीपोटी दहा लाख रुपये नुकसान भरपाई मिळावी. तसेच भविष्यात सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी अर्जदार हिचा कोणताही छळ करु नये या तसेच अर्जात इतर नमुद मागण्यां करिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०६. प्रस्तुत प्रकरणी सामनेवाला क्र.१ ते ३ यांच्यावर नोटीसची बजावणी करण्यात आली. परंतु सामनेवाला क्र.२ व ३ हजर न झाल्याने प्रस्तुत प्रकरण सामनेवाला क्र.२ व ३ करिता एकतर्फा चालविण्यात आले. सामनेवाला क्र.१ याने प्रस्तुत प्रकरणी हजर होऊन निशाणी क्र.१३ येथे आपले म्हणणे दाखल केले आहे. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिच्या अर्जातील सर्व कथनांचा स्पष्ट शब्दात नकार केला आहे. सामनेवाला क्र.१ याने असे कथन केले आहे की, सामनेवाला क्र.१ याला वृध्दापकाळात सोबत व्हावी तसेच सामनेवाला क्र.२ व ३ यांना त्यांच्या आईची माया मिळावी याकरिता त्याने अर्जदार हिच्याशी लग्न केले होते. अर्जदार हिने तिचे पहिले लग्न झालेले आहे ही बाब सामनेवाला क्र.१ याच्या पासून जाणीवपुर्वक लपवून ठेवली होती.

०७. सामनेवाला क्र.१ याने असे कथन केले आहे की, लग्नानंतर अर्जदार हिने तिचा खरा व मूळ स्वभाव सामनेवाला यांना दाखविण्यास सुरवात केली. अर्जदार ही सामनेवाला यांच्याशी विनाकारण कुरापती उकरुन

काढत असे. तसेच सामनेवाला यांना मारण्यासाठी त्यांच्या अंगावर धावून जाण्याचा प्रयत्न करणे असे प्रकार करत असे. अर्जदार हिच्या वर्तणुकीमुळे सामनेवाला यांचे आयुष्य असह्य बनले होते. तरी देखील सामनेवाला क्र.१ हा अर्जदार हिच्या सोबत सुखी संसार करुन वैवाहीक जीवन सुखाने व समाधानाने जगण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत होता. सामनेवाला क्र.१ याने मध्यस्थां मार्फत अर्जदार हिला नांदवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याला यश आले नाही.

०८. सामनेवाला क्र.१ याने पुढे असे कथन केले आहे की, केवळ सामनेवाला क्र.१ यास मानसिक व शारिरीक त्रास देण्याच्या हेतुने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जास कोणतेही संयुक्तीक, सबळ व समाधानकारक कारण घडलेले नाही. अर्जदार हिने स्वत:हून सामनेवाला क्र.१ यांचा त्याग केला आहे. अर्जदार हिच्या माहेरची परिस्थीती चांगली आहे. वरील सर्व परिस्थीतीचा विचार करता प्रस्तुत अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०९. अर्जदार हिने तिच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ स्वतःचे सरतपासाचे शपथपत्र निशाणी क्र.१७ येथे सादर केले आहे. तसेच अर्जदार हिने आपले मालमत्ता, खर्च व दायित्वाबाबतचे प्रमाणपत्र निशाणी क्र.६५ येथे दाखल केले आहे. अर्जदार हिने निशाणी क्र.१८ येथे पुरशीस दाखल करुन आपला पुरावा बंद केला आहे. याउलट सामनेवाला यांना पुरावा देण्याची संधी देऊन देखील त्यांनी पुरावा दाखल न केल्याने सामनेवाला यांचा पुरावा निशाणी क्र.१ येथे आदेश पारित करुन बंद करण्यात आला आहे.

१०. अर्जदार तर्फे वकील श्रीमती एस.एस.कालेकर यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी अर्जातील कथना प्रमाणे युक्तीवाद करुन प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. तसेच सामनेवाला तर्फे वकील श्री.आर.एस.गव्हाणकर यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी अर्जदार हिने कोणताही पुष्टी देणारा पुरावा (Corroborative Evidence) दिलेला नसल्याने प्रस्तुत अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

११. अर्जदार हिच्या अर्जातील कथने त्यास सामनेवाला यांनी दाखल केलेले म्हणणे तसेच अर्जदार यांनी अभिलेखावर दाखल केलेला पुरावा व अर्जदार तर्फे वकील व सामनेवाला तर्फे वकील यांनी केलेला युक्तीवाद यांचे अवलोकन केले असता खालील प्रश्न माझ्या अवलोकनार्थ उपस्थित झाले. त्यांचे निम्नलिखीत कारणमिमांसेवर आधारीत उत्तरे अभिलिखीत करण्यात आलेली आहेत.

| **अ.क्र.** | **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी अर्जदार हिचेवर कौटुंबिक हिंसाचार केला आहे हे अर्जदार सिध्द करते का? | होकारार्थी |
| २. | अर्जदार तिच्या मागणी प्रमाणे संरक्षण आदेश मिळणेस पात्र आहे का? | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ३. | अर्जदार मागणी करते त्या प्रमाणे निवारा आदेश मिळणेस पात्र आहे का? | होकारार्थी |
| ४. | अर्जदार मागणी करते त्या प्रमाणे रक्कम रु.१०,००,०००/- नुकसान भरपाई मिळणेस पात्र आहे का? | अंशत: होकारार्थी |
| ५. | अर्जदार मागणी करते त्या प्रमाणे रु. १०,०००/- दरमहा आर्थिक मदत मिळणेस पात्र आहे का? | अंशत: होकारार्थी |
| ६. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

### <u>प्रश्न क्र.१ करीता</u> -

१२. अर्जदार हिने आपल्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, लग्रा नंतर अर्जदार ही सामनेवाला याच्या घरी नांदावयास गेली. त्यानंतर सामनेवाला क्र.१ यांनी अर्जदार हिच्या सोबत एक ते दोन महिने कसाबसा सुखाने संसार केला. परंतु त्यानंतर सामनेवाला क्र.१ ते ३ हे अर्जदार हिला घाणेरडया शिव्या देऊ लागले. तसेच अर्जदार हिला दोन-दोन दिवस जेवण्यास न देणे, सतत अपमान व मारझोड करणे असे प्रकार करु लागले. परंतु संसार टिकवण्याच्या हेतुने व सामनेवाला क्र.१ ते ३ यांच्या स्वभावात

बदल होईल या आशेने अर्जदार ही सामनेवाला यांचा छळ सहन करत राहिली. सामनेवाला यांच्या छळामुळे अर्जदार हिला ब्लड प्रेशर व थायरॉईड सारखे आजार जडले. अर्जदार हिने आपल्या कथनांच्या पुष्टयर्थ नि.क्र.१७ येथे आपले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदार हिने आपल्या सरतपासामध्ये आपल्या अर्जातील कथनांचा पुर्नउल्लेख केला आहे. जरी सामनेवाला क्र.१ याने निशाणी क्र.१३ येथे आपले म्हणणे दाखल करुन अर्जदार हिच्या कथनांचा नकार केला असला तरी सामनेवाला यांना संधी देऊन देखील त्यांनी अर्जदार हिचा कोणताही उलटतपास घेतलेला नाही. त्यामुळे अर्जदार हिच्या सरतपासातील कथने विना आव्हानित राहिली आहेत. त्यामुळे अर्जदार हिने आपल्या अर्जातील कथने शाबीत केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे अर्जदार ही सामनेवाला क्र.१ ते ३ यांच्या कौटुंबिक हिंसाचारास बळी पडल्याचे शाबीत होते. त्यामुळे मी प्रश्न क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवत आहे.

**प्रश्न क्र.२ करीता** –

१३. अर्जदार हिने आपल्या अर्जात सामनेवाला क्र.१ ते ३ यांच्या विरोधात संरक्षण आदेशाची मागणी केली आहे. सामनेवाला क्र.१ ते ३ यांची आजपर्यंतची कृती पाहिली असता, तसेच अर्जदार व सामनेवाला क्र.१ ते ३ यांचे संबंध लक्षात घेता, भविष्यात देखील सामनेवाला क्र.१ ते ३ हे अर्जदार हिच्या बाबत हिंसक कृत्य करण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थीतीत अर्जदार हिच्या बाबत सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी कोणतेही हिंसक कृत्य करू नये या करिता महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण

अधिनियम कलम १८ अन्वये संरक्षणात्मक आदेश पारित करणे आवश्यक वाटते. त्यामुळे मी प्रश्न क्र.२ चे उत्तर होकारार्थी नोंदवत आहे.

**प्रश्न क्र.३ करीता –**

१४. अर्जदार हिच्या कथना नुसार दि.०४/११/२०१९ रोजी सामनेवाला क्र.१ व २ यांनी अर्जदार हिला घाणेरडया व अश्लील शिव्या देऊन तिला हाताला धरुन घरातून बाहेर काढले. तेव्हा पासून अर्जदार ही आपल्या माहेरी मौजे हिंदळे येथे राहत आहे. अर्जदार हिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तसेच तिच्या माहेरची परिस्थीती देखील हालाखिची व गरिबीची आहे. सामनेवाला यांनी आपल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, त्यांनी मध्यस्थां मार्फत तोंडी निरोप पाठवले तसेच विनंत्या केल्या व अर्जदार हिला नांदायला आणण्याचे प्रामाणिक प्रयत्न केले. यावरुन अर्जदार ही सामनेवाला क्र.१ याच्या सोबत राहत नसल्याचे शाबीत होते. जरी सामनेवाला यांनी अर्जदार हिने त्यांचा कोणतेही कारण नसताना त्याग केला असे कथन केले असले तरी सदर बाब शाबीत करण्या करिता सामनेवाला यांनी कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. याउलट अर्जदार हिने आपल्या अर्जातील कथनांच्या पुष्टयर्थ आपले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदार हिचा उलटतपास न झाल्यामुळे अर्जदार हिच्या सरतपासातील कथने विना आव्हानित राहिली आहेत. त्यामुळे अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असल्याने पती म्हणून तिच्या निवाऱ्याची सोय करणे हे सामनेवाला क्र.१ याचे कर्तव्य आहे. त्यामुळे अर्जदार हिच्या निवासाची व्यवस्था करणे ही सामनेवाला याची नैतिक

जबाबदारी आहे. त्यामुळे महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम कलम १९ अन्वये अर्जदार ही निश्चीतच निवारा आदेश मिळणेस पात्र आहे. त्यामुळे मी प्रश्न क्र.३ चे उत्तर होकारार्थी नोंदवत आहे. त्याबाबत अंतिम आदेशामध्ये निर्देश देण्यात येतील.

**प्रश्न क्र.४ करिता –**

१५. अर्जदार हीने तिच्या बाबत झालेल्या हिंसाचाराची नुकसान भरपाई म्हणून सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी एकूण रक्कम रु.१०,००,०००/– देण्याची मागणी केली आहे. अर्जदार हिच्या अर्जातील कथने तसेच अर्जदार हिने दाखल केलेले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले असता निश्चीतच अर्जदार ही सामनेवाला क्र.१ ते ३ यांच्या हिंसाचारास बळी पडल्याचे शाबीत होते. त्यामुळे अर्जदार ही निश्चीतच सामनेवाला क्र.१ ते ३ यांच्या कडून नुकसान भरपाई मिळणेस पात्र आहे. अर्जदार हिने जरी रक्कम रु.१०,००,०००/– नुकसान भरपाईची मागणी केली असली तरी अर्जदार हिच्या अर्जातील कथनांचा विचार करता अर्जदार हिस रक्कम रु.१,००,०००/– नुकसान भरपाई मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे मी प्रश्न क्र.४ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवत आहे.

**प्रश्न क्र.५ करिता –**

१६. अर्जदार हिच्या कथना नुसार अर्जदार ही आपल्या माहेरी मौजे हिंदळे येथे राहत आहे. अर्जदार हिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तसेच

तिच्या माहेरची परिस्थीती देखील हालाखिची व गरिबीची आहे. याउलट सामनेवाला क्र.१ याला दरमहा ५५,०००/- ते ६०,०००/- रुपये पगार मिळतो. सामनेवाला क्र.३ ही मुंबई येथे नर्स म्हणून कार्यरत असून तिला देखील दरमहा ३०,०००/- रुपये पगार आहे. अर्जदार हिच्या कथना नुसार तिच्या उदरनिर्वाह तसेच औषधोपचारा करिता तिला सामनेवाला क्र.१ याच्या कडून दरमहा किमान रक्कम रुपये दहा हजार पोटगी मिळावी अशी मागणी केली आहे. सामनेवाला यांनी आपल्या म्हणण्यात अर्जदार हिच्या माहेरची परिस्थीती चांगली असल्याचे कथन केले आहे. परंतु त्यांच्या उत्पन्नाबाबत कोणताही ऊहापोह सामनेवाला क्र.१ याने केलेला नाही. प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांनी आपले मालमत्ता, खर्च व दायित्वचे प्रमाणपत्र निशाणी क्र.६५ येथे दाखल केले आहे. याउलट सामनेवाला क्र.१ याने आपले कोणतेही मालमत्ता, खर्च व दायित्वचे प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केले नाही. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालय यांनी Rajnesh Vs. Neha and Ors. (Arising out of SLP (Crl.) No. 9503 of 2018) मध्ये दिलेल्या निर्देशा नुसार अर्जदार यांच्या मालमत्ता, खर्च व दायित्वचे प्रमाणपत्रावर भिस्त ठेवावी लागेल. जरी अर्जदार यांनी सामनेवाला यांच्या मासिक उत्पन्नाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा हजर केलेला नसला तरी त्यांनी आपल्या कथनांच्या पुष्ट्यर्थ आपले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे जे की अबाधित राहिले आहे. तसेच सामनेवाला क्र.१ हा अर्जदार हिचा पती असल्याने अर्जदार हिच्या पालन पोषणाची नैतिक जबाबदारी सामनेवाला याच्यावर आहे. जरी अर्जदार यांनी दरमहा रक्कम रु.१०,०००/- पोटगीची मागणी केली असली तरी सामनेवाला याचे उत्पन्न, तसेच अर्जदार यांच्या गरजा यांचा विचार केला असता अर्जदार हीस

प्रतिमहा रक्कम रु.४,०००/- अर्ज दाखल तारखे पासून देण्याबाबत आदेश करणे न्यायोचित वाटते. तसेच रक्कम रु.१,५००/- निवासाच्या सोयी करिता प्रतिमहा अर्ज दाखल तारखे पासून देण्याबाबत आदेश करणे न्यायोचित वाटते. त्यामुळे मी प्रश्न क्र.५ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवत आहे.

**प्रश्न क्र.६ करीता** –

१७. सबब, अर्जदार यांच्या अर्जातील कथने, अर्जदार हिचा तोंडी व कागदोपत्री पुरावा याच्या अवलोकनातून मी प्रश्न क्र.१, २, ३ चे उत्तर होकारार्थी तसेच प्रश्न क्र.४ व ५ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदवून प्रश्न क्र.६ करिता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी अर्जदार हिला फोन, चिठ्ठी, निरोप या द्वारे कोणताही त्रास देऊ नये अथवा शिवीगाळ व मारझोड करु नये असा आदेश पारित करण्यात येतो.

३. सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी अर्जदार हिच्या केलेल्या शारीरिक व मानसिक छळापोटी अर्जदार हिस रक्कम रु.१,००,०००/- नुकसान भरपाई स्वतंत्रपणे किंवा एकत्रितात अदा करावी.

४. सामनेवाला क्र.१ याने अर्जदार यांना अर्ज दाखल तारखे पासून दरमहा एकूण रक्कम रु.४,०००/- आर्थिक सहाय्य व निवासी आदेशा करिता दरमहा रक्कम रु.१५००/- अदा करावेत.

५. सामनेवाला क्र.१ यांनी आजपर्यंत अंतरिम आदेशा नुसार अर्जदार यांना अदा केलेली एकूण रक्कम ही अर्ज दाखल तारखे पासून होणाऱ्या एकूण रक्कमेतून वजा करावी.

६. या आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यांना मोफत देण्यात यावी.

७. सदर आदेशाची एक प्रत पोलीस निरीक्षक, देवगड व संरक्षण अधिकारी, देवगड यांना पाठविण्यात यावी.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला. )

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.08.01 17:59:53 +0530

( श्रीकांत एस. पचंडी)
दिनांक: ०१/०८/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग - १, देवगड